**<u>भुसंपादन संदर्भ क्र.७७/२०२० मधील निशाणी क्र.९ खालील आदेश</u>**

**<u>उपविभागीय अधिकारी वि. विठ्ठल सावळे व इतर</u>**

अर्जदार अनिल विठ्ठलराव ठाकरे यांनी प्रकरणामध्ये प्रतिवादी म्हणून दाखल करुन घेण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणाशी विठ्ठल सावळे व बेबीबाई यांचा कुठलाही संबंध नाही. परंतु कोणतीही शहानिशा न करता वादीने चुकीच्या प्रतिवादीविरुद्ध सदर प्रकरण दाखल केले आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रकरणातील वादग्रस्त जागा ही अर्जदाराची आहे. सदरची जागा ही अर्जदाराने नोंदणीकृत खरेदीखताने दि.०३/०२/२००४ साली विकत घेतलेली आहे. कैलास उत्तम सावळे यांनी ग्रा.पं. मालमत्ता क्र.२२१ गट क्र.१७५ मधील ३० बाय ३० ची जागा अर्जदाराला नोंदणीकृत खरेदीखताने विकलेली आहे व सदरची जागा ही भुसंपादनामध्ये अधिग्रहीत करण्यात आलेली आहे. अर्जदाराने उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांच्यासमक्ष दि.१२/०९/२०१८ रोजी लेखी हरकत घेतली होती परंतु त्याची कोणतीही दखल घेतली नाही. सदर प्रकरणामध्ये जमा करण्यात आलेला भुसंपादनाचा मोबदला अर्जदार यालाच मिळणे न्याय व इष्ट आहे. परंतु वादीने चुकीच्या प्रतिवादींविरुद्ध प्रकरण दाखल केले आहे. अशा परिस्थीतीमध्ये अर्जदाराला प्रतिवादी क्र.३ म्हणून प्रकरणामध्ये दाखल करुन घेणे अत्यंत महत्वाचे आहे अन्यथा प्रतिवादीचे न भरुन निघणारे नुकसार हाईल. करीता प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. अर्जदारातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.एन.काळू यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास तिव्र आक्षेप नोंदविला आहे. तसेच राजस्व विभागाच्या अधिकार अभिलेखात जी नोंद असेल त्यानुसार संपादित जमीनीचा मोबदला देण्यात येतो. परंतु अधिकाराबाबत वाद प्रविष्ट केलेला असल्यास किंवा तसा आक्षेप असल्यास आक्षेपकर्त्यास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात

येते. आक्षेपकर्त्यांनी योग्य असे कागदपत्रे दाखल केलेले नसून संपादीत जमिनीशी कोणताही संबंध व अधिकार दर्शवू शकलेला नाही. तसे काही असल्यास स्वतंत्र दावा करुन उद्घोषणा जाहीर करुन घ्यावी लागेल. अशा परिस्थतीत सदरचा अर्जास तिव्र आक्षेप नोंदवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. गैर अर्जदार क्र.१ तर्फे त्यांच्या विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल केले व अर्जास विरोध केला आहे. त्यांनी असे कथन केले की, सदर प्रकरणामध्ये अर्जदाराचा कोणताही संबंध नाही कारण प्रकरण हे प्रतिवादी क्र.१ ला मोबदला रक्कम न दिल्यामुळे दाखल केले आहे. तसेच प्रकरणात अर्जदाराचा म्हणजेच अनिल ठाकरे यांचा कोणताही संबंध नाही. अनिल ठाकरे व प्रतिवादी क्र.२ यांचा व्यवहाराबाबत प्रतिवादी क्र.१ ला काहिही घेणेदेणे नाही त्यामुळे अर्जदार व प्रतिवादी क्र.२ यांचा वाद असून प्रकरणामध्ये या दोघांचाही कोणताही संबंध नाही. त्यामुळे प्रतिवादी म्हणून अर्जदाराला दाखल करुन घेण्याबाबत विरोध दर्शवून प्रस्तुत अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

४. गैर अर्जदार क्र.२ तर्फे त्यांच्या विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल केले व अर्जास विरोध केला आहे. अर्जातील अर्जदाराचे कथन योग्य नसल्याचे त्यांनी कथन केले. कैलास उत्तम सावळे यांनी मालमत्ता क्र.२२१ हे अर्जदाराला विकले त्याचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही. तसेच सदरचा आक्षेप अर्ज विहित कालावधीमध्ये दाखल केलेला नाही त्यामुळे प्रस्तुत अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरहू अर्जदार अनिल विठोबा ठाकरे यांनी असे कथन केले की, संपादीत जमीन ही त्याच्या मालकीची असून सदरहू जमीन त्याने दि.०३/०२/२००४ रोजी विकत घेतली आहे. अर्जदाराचे पुढील कथन असे आहे की, त्याने भूसंपादन अधिकारी यांच्या कडून दि.१२/०९/२०१८ रोजी लेखी हरकत घेतली होती. त्या अर्जाची प्रत दाखल

केली आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे भूसंपादनाचा मोबदला न्यायालयात जमा करण्यात आला आहे. सदर मोबदला अर्जदाराला मिळणे योग्य आहे. त्यामुळे अर्जदाराने या प्रकरणात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. याउलट प्रतिवादी क्र.२ च्या कथनानुसार प्रस्तुत अर्जदाराचा संपादीत जमीनीशी कोणताही संबंध नाही त्यामुळेच त्याला या प्रकरणातील गैरअर्जदार म्हणून समाविष्ट करणे योग्य ठरणार नाही. प्रकरणातील इतर पक्षकारांनी देखील तशाच प्रकारचे कथन केले आहे.

६. अर्जदाराने दाखल केलेले कागदपत्र पाहिले. त्याने कागदपत्रासोबत दि.०३/०२/२००४ रोजीचे खरेदीपत्र दाखल केले आहे. परंतु सदर खेरदीपत्रावरुन खरेदीपत्रात नमुद जागा संपादीत करण्यात आल्याचा बोध होत नाही. तसेच अर्जदाराची जागा संपादीत जागेपैकी आहे हे अर्जदाराचे म्हणणे सिद्ध करण्याची संधी अर्जदारास देणे योग्य ठरेल. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर पक्षकार यांना प्रतिवादी क्र.३ म्हणून दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे. तशा आशयाची दुरुस्ती प्रकरण दाखल करणार उपविभागीय अधिकारी यांनी निशाणी क्र.१ मध्ये करावी असे निर्देश देण्यात येत आहे.

SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE

Digitally signed by SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Date: 2025.11.28 17:50:20 +0530

( एस. एस. सहस्त्रबुद्धे )

दिनांक – २७/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाशिम.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word to word, as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- S. V. Dere (Stenographer G-III) |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Washim. |
| 3) | Date | :- 27/11/2025 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 27/11/2025 |
| 5) | Order uploaded on | :- 28/11/2025 |